# ॲबॉट इंडिया लिमिटेड

सीआयएन : एल२४२३९एमएच१९४४पीएलसी००७३३०
नोंदणी. कार्यालय : ३-४, कॉर्पोरेट पार्क, सायन-ट्रॉम्बे रोड, मुंबई-४०० ०७१
ई-मेल आयडी : investor.relations@abbott.com
फोन नंबर : ०२२-२८७१ ७५००/६७९७ ८८८८, फॅक्स नं. : ०२२-२८७१ ७४९९/६७९७ ८७२७
वेबसाइट : www.abbott.co.in

## बहात्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा, रिमोट ई-व्होटिंग आणि बुक क्लोजर यांची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता वार्षिक अहवाल, रिमोट ई-व्होटिंग फॉर्म, प्रोक्सी फॉर्म आणि अटेण्डन्स स्लिपसमवेत सभासदांना पाठविण्यात आलेल्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज करण्याकरिता सोमवार, १८ जुलै २०१६ रोजी दुपारी ३.३० वाजता रमा ॲण्ड सुन्द्री वटुमल ऑडिटोरियम, के. सी. कॉलेज, १२४, दिनशॉ वाच्छा रोड, विद्यासागर प्रिन्सि. के. एम. कुन्दनानी चौक, चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र-४०० ०२० येथे ॲबॉट इंडिया लिमिटेडची ("कंपनी") बहात्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") घेण्यात येईल.

अशीही सूचना देण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३च्या कलम ९१च्या तरतुदींच्या अनुषंगाने आणि दी सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) विनियम, २०१५ नुसार कंपनीची लाभार्थी मालकांची नोंदवही, सदस्यांची नोंदवही व भाग हस्तांतरण पुस्तके मंगळवार, १२ जुलै २०१६ पासून सोमवार, १८ जुलै २०१६ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

मंडळाने शिफारस केलेला प्रति भाग रु. ३५.००/-चा लाभांश येत्या एजीएममध्ये सदस्यांनी मंजूर केल्यास, १८ जुलै २०१६ रोजीनुसार सदस्यांच्या नोंदवहीत ज्यांची नावे नमूद असतील अशा सदस्यांना आणि या कारणासाठी डिपॉझिटरींनी सादर केलेल्या तपशिलांनुसार ११ जुलै २०१६ रोजीनुसार भागांचे लाभार्थी मालक असलेल्यांना २६ जुलै २०१६ रोजी व पासून प्रदान केला जाईल.

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१५च्या नियम २० सह कंपनी अधिनियम, २०१३च्या कलम १०८ नुसार आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) विनियम, २०१५चा विनियम ४४ नुसार बहात्तराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेला आमंत्रित करणाऱ्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारा आपली मते नोंदविण्यासाठी सदस्यांना कंपनीने रिमोट ई-व्होटिंग सुविधा प्रस्तुत केली आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ आणि त्याअंतर्गत केलेले नियम यानुसार आवश्यक तपशील खाली देण्यात येत आहेत :

१. बहात्तराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेला आमंत्रित करणारी सूचना रिमोट ई-व्होटिंग फॉर्म, प्रोक्सी फॉर्म आणि अटेण्डन्स स्लिप अंतर्भूत असलेला आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता वित्तीय अहवाल सदस्यांना २२ जून २०१६ रोजी टपालाने पाठविण्यात आला/ ई-मेल करण्यात आला (कंपनीकडे/ डिपॉझिटरीजकडे नोंदविलेल्या ई-मेल आयडींवर). पूर्वोक्त कागदपत्रे कंपनीच्या वेबसाइटवर www.abbott.co.in मध्ये आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड (एनएसडीएल)च्या वेबसाइटवर www.evoting.nsdl.com मध्येसुद्धा उपलब्ध आहेत.

२. कंपनीच्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक व्होटिंग सुविधा पुरविण्यासाठी कंपनीने एनएसडीएल व्यवस्थेला नियुक्त केले आहे.

३. रिमोट ई-व्होटिंग सुविधा पुढील मतदान कालावधीत उपलब्ध असेल :

| | |
|---|---|
| रिमोट ई-व्होटिंगचा प्रारंभ : | **१५ जुलै २०१६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून (भारतीय प्रमाणवेळेनुसार)** |
| रिमोट ई-व्होटिंग समाप्ती : | **१७ जुलै २०१६ रोजी सायं. ५ वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार)** |

पूर्वोक्त तारीख व वेळेनंतर रिमोट ई-व्होटिंग करता येणार नाही आणि पूर्वोक्त मुदत संपल्यावर एनएसडीएलकडून रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल नि:समर्थ केले जाईल.

४. रिमोट ई-व्होटिंग आणि वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान यासाठी कट-ऑफ डेट आहे ११ जुलै २०१६ ("कट-ऑफ डेट"). केवळ कट-ऑफ डेट रोजीनुसार ज्यांचे नाव सदस्यांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरींनी केलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत नोंदविलेले असेल अशीच व्यक्ती रिमोट ई-व्होटिंग सुविधेचा लाभ घेण्यास तसेच मतपत्रिकेद्वारा वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान करण्यास अधिकारपात्र राहील.

५. सदस्यांचे मतदान हक्क हे कट-ऑफ डेट रोजीनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलाशी त्यांच्या भागांच्या प्रमाणानुसारी असतील.

६. ज्यांचे ई-मेल आयडीज कंपनीकडे नोंदविलेले आहेत असा सदस्यांना एनएसडीएलकडून ई-मेलद्वारा युजर आयडी व पासवर्ड पाठविला जाईल. वार्षिक अहवाल आणि अन्य कागदपत्रांची प्रत्यक्ष प्रत प्राप्त करणाऱ्या सदस्यांना रिमोट ई-व्होटिंग प्रपत्रातून युजर आयडी व प्रारंभिक पासवर्ड देण्यात येईल. सदस्य जर अगोदरच रिमोट ई-व्होटिंगसाठी एनएसडीएलकडे नोंदणीकृत असेल तर आपले मत नोंदविण्याकरिता त्यांना आपला विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरता येईल.

७. सूचना पाठविण्याच्या तारखेनंतर कंपनीचे भाग संपादन करून एखादी व्यक्ती जर कंपनीची सदस्य बनली आणि कट-ऑफ डेट रोजीनुसार ती भागधारक असेल तर evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून तिला लॉग इन आयडी आणि पासवर्ड मिळविता येईल.

८. मतपत्रिकेद्वारा मतदान करण्याची सुविधा वार्षिक सर्वसाधारण सभेत पुरविली जाईल. सभेला उपस्थित असलेले व त्यापूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारा ज्यांनी आपले मत नोंदविले नाही असे सदस्य या सभेत मतदान करू शकतील.

९. रिमोट ई-व्होटिंगद्वारा मतदान करण्याचा आपला हक्क बजावल्यानंतरही सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होता येईल; परंतु त्यांना पुन्हा सभेत मतदान करता येणार नाही.

१०. सदस्याने रिमोट ई-व्होटिंगद्वारा ठरावावर एकदा आपले मत नोंदविले की त्याला त्यात फेरबदल करता येणार नाही अथवा पुन्हा मतदान करता येणार नाही.

११. ई-व्होटिंग प्रक्रिया न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याकरिता परीनिरीक्षक म्हणून श्री. तायझून एम. खुम्री या कार्यरत कंपनी सचिवांची (सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस नं. : ८८) (मेम्बरशिप नं. : एफसीएस९९३) नेमणूक करण्यात आली आहे.

१२. सभेतील मतदान संपल्यानंतर परीनिरीक्षक सभेत नोंदविण्यात आलेली मते मोजतील व कंपनीच्या सेवेत नसलेल्या किमान दोन साक्षीदारांसमक्ष रिमोट ई-व्होटिंगद्वारा नोंदविलेली मते अन्लॉक करतील आणि उशिरात उशिरा म्हणजे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या समाप्तीनंतर ४८ तासांत ठरावाच्या बाजूने किंवा विरोधात, असल्यास, नोंदविण्यात आलेल्या एकूण मतांचा परीनिरीक्षकांचा एकत्रिकृत अहवाल अध्यक्षांकडे अथवा त्यांनी लेखी स्वरूपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडे सादर करतील जे त्यावर प्रतिस्वाक्षरी करतील आणि त्यानंतर मतदानाचा निकाल जाहीर करतील.

१३. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या समाप्तीपासून अठ्ठेचाळीस तासांत किंवा त्या वेळी अध्यक्ष अथवा त्यांनी लेखी स्वरूपात प्राधिकृत केलेली अन्य कोणतीही व्यक्ती निकाल जाहीर करील. जाहीर केलेला निकाल परीनिरीक्षकांच्या एकत्रिकृत अहवालासह कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजेच www.abbott.co.in मध्ये आणि एनएसडीएलच्या वेबसाइटवर निकाल जाहीर झाल्याबरोबर ताबडतोब प्रसारित केला जाईल. त्याच वेळी बीएसई लिमिटेड, मुंबई यांच्याकडे निकाल पाठविण्यात येईल.

१४. वर्ष २०१५-१६ च्या वार्षिक अहवालासोबत सदस्यांना पाठविलेल्या एजीएमच्या सूचनेला जोडलेल्या रिमोट ई-व्होटिंग फॉर्ममध्ये मतदानाची सविस्तर प्रक्रिया आणि पद्धत नमूद करण्यात आली आहे.

१५. **आवश्यक संख्येत मते मिळण्यासापेक्ष वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेला म्हणजेच १८ जुलै २०१६ रोजी ठराव पारित झाल्याचे मानण्यात येईल.**

१६. काही विचारणा असणाऱ्या सदस्यांनी www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड्स सेक्शनमध्ये भागधारकांकरिता उपलब्ध असलेले रिमोट ई-व्होटिंग युजर मॅन्युअल आणि फ्रिक्वेन्टली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यूज) पाहावेत किंवा नि:शुल्क क्रमांक १८००-२२२-९९० वर फोन करावा.

१७. इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारा मतदान करण्याच्या सुविधेशी संबंधित विचारणा/ तक्रारी सदस्यांनी खालील अधिकाऱ्यांकडे नोंदवाव्यात :

**नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) :**
श्रीमती पल्लवी म्हात्रे, साहाय्यक व्यवस्थापक,
नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड,
ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४था मजला,
कमला मिल्स कम्पाऊण्ड, सेनापती बापट मार्ग,
लोअर परळ, मुंबई-४०० ०१३
ई-मेल : evoting@nsdl.co.in
फोन नंबर : १८००-२२२-९९०

मंडळाच्या आदेशावरून

स्थळ : मुंबई
दिनांक : २३ जून २०१६

**कृपा आनंदपारा**
कंपनी सचिव
मेम्बरशिप नं. : एसीएस १६५३६

Abbott